Literacy for a Billion

Movie: Agnipariksha
Year: 2010

Song: He Ghar Majhe
Lyricist:

माझ्याशी बोलते कधी
हसते रूसते कधी
पाण्यात खेळते कधी
वाऱ्यात डुलते कधी
धुंदीत फूल राहते
दवात भिजते कळ्या फुलात राहते
कधी स्वप्नात रंगते
हळू गालात हसते
नाते प्रेमाचे नाजूक जपते
हे घर माझे घर माझे
हे घर माझे
हे घर माझे घर माझे
हे घर माझे

सासू सासरा नणंद माझी
अनमोल जणू ही खाण सुखाची
प्रेम किती हा करतो साजण
प्रेम किती हा करतो साजण
झाली पूर्तता त्या स्वप्नांची
सावली ते होते कधी
उन्हाला सोसते कधी
फुलांना वेचते कधी
चांदणे वाचते कधी
पाठीशी माझ्या ते असते
दवात भिजते कळ्या फुलात राहते
कधी स्वप्नात रंगते
हळू गालात हसते
नाते प्रेमाचे नाजूक जपते
हे घर माझे घर माझे
हे घर माझे
हे घर माझे घर माझे
हे घर माझे

होऊन ती काठी आधार देई
चुकल्यावर ते जवळही घेई
किती हे मजला सांभाळीते
किती हे मजला सांभाळीते
गत जन्मीची ही पुण्याई
गुपित सांगते कधी
कोडंच राहते कधी
सारेच कळते कधी
काही ना कळते
कसे मनात माझ्या हे वसते
दवात भिजते कळ्या फुलात राहते
कधी स्वप्नात रंगते
हळू गालात हसते
नाते प्रेमाचे नाजूक जपते
हे घर माझे घर माझे
हे घर माझे
हे घर माझे घर माझे
हे घर माझे

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*